# मंगलाबाई भागवत फाऊंडेशन

**वेळ : 2 तास** **भूगोल** **एकूण गुण : 40**

---

**सूचनाः**

1. सर्व प्रश्न/कृती सोडवणे आवश्यक आहे.
2. उजवीकडील अंक पूर्ण गुण दर्शवतात.
3. प्रश्न 4(अ) साठी पुरवण्यात आलेला भारत/ब्राझील नकाशा आराखडा व पान क्र. 6(अ) साठी पुरवण्यात आलेल्या आलेख कागद यांचा वापर करून ते मुख्य उत्तरपत्रिकेस जोडावेत.
4. नकाशा काढण्यासाठी स्टेन्सिलचा वापर करण्यास परवानगी आहे.
5. प्रश्नांची उत्तरे देताना आवश्यक तेथे आकृत्या, आलेख काढावेत.
6. प्रश्नांची उत्तरे निळ्या किंवा काळ्या शाईच्या पेनने लिहावीत.
7. शिसपेन्सिल वापरण्यास हरकत नाही, रंगीत पेन्सिलचा उपयोग आकृत्या, आराखडे, नकाशा कार्य इत्यादीसाठी करावा
8. पेन्सिलने लिहिलेली उत्तरे भरण्यात येणार नाहीत

**प्र. 1. अचूक पर्याय निवडा व विधाने पुन्हा लिहा.** **(4)**

1. अमेझॉन नदीचे खोरे मुख्यतः .............

   i. अवर्षणग्रस्त आहे. ii. दलदलीचा आहे

   iii. मानवी वस्तीस प्रतिकूल आहे. iv. सुपीक आहे.

2. भारताची अर्थव्यवस्था ही .............. स्वरुपाची आहे.

   i. मिश्र ii. भांडवलशाही

   iii. समाजवादी iv. मार्क्सवादी

3. गोलार्धाचा विचार करता ब्राझील प्रामुख्याने खालीलपैकी कोणत्या गोलार्धात आहे?



4. ब्राझीलमधील ........ या राज्यात सर्वात कमी नागरीकरण झालेले दिसून येते.

i. पारा  ii. अमापा

iii. एस्पिरितो सातो  iv. पराना

**प्र. 2. योग्य जोड्या जुळवा. (4)**

| 'अ' गट | | 'ब' गट | |
|---|---|---|---|
| 1. | स्थूल देशांतर्गत उत्पादनातील वाढ | अ. | ८२° ३०′ पू |
| 2. | गंगेचे मैदान | ब. | ८०° ३०′ पू |
| 3. | अटलांटिक महासागर | क. | बंदर |
| 4. | अलाहाबाद | ड. | ब्राझीलच्या पूर्वेस |
| | | इ. | लोकसंख्येची जास्त घनता |
| | | फ. | आर्थिक विकास |

**प्र. 3. नावे द्या (कोणतेही चार) (4)**

1. ब्राझीलमध्ये या वाऱ्यापासून पाऊस पडतो.
2. भारतातील किनारपट्टीवरील या राज्यातील लोकांच्या आहारामध्ये मासे हा महत्त्वाचा घटक आहे.
3. भारतातील सदाहरित वनांमध्ये हे वृक्ष आढळतात.
4. ब्राझीलमधील ही शहरे मोठ्या संख्येने पर्यटकांना आकर्षित करतात.
5. बंगालच्या उपसागराला मिळणाऱ्या भारतीय दृविपकल्पावरील नद्या

**प्र. 4.(अ) भारताच्या आराखड्यामध्ये दिलेली माहिती भरा व सूची तयार करा. (कोणतेही चार) (4)**

1. लक्षद्वीप बेटे  2. पूर्व किनाऱ्यावरील एक बंदर

3. कांडला बंदर  4. बंगालचा उपसागर

5. उत्तर–दक्षिण महामार्ग  6. एक केंद्रशासित प्रदेश

**प्र. 4.(आ) ब्राझीलच्या नकाशाचे वाचन करुन खालील प्रश्नांची उत्तरे लिहा. (कोणतेही चार)** **(4)**




1. ब्राझीलमध्ये उसाचे उत्पादन कोणत्या भागात केले जाते?
2. ब्राझीलमध्ये कोणत्या भागात काकाओचे उत्पादन केंद्रित झाले आहे?
3. ब्राझीलमध्ये पशुपालन व्यवसाय प्रामुख्याने कोठे चालतो ?
4. ब्राझीलमध्ये कोणत्या ठिकाणी बॉक्साइट आढळतो ?
5. ब्राझीलमध्ये कोळशाचे उत्पादन कोठे होते ?

**प्र. 5. भौगोलिक कारणे लिहा. (कोणतेही दोन)** **(6)**

1. ईशान्य मान्सून वाऱ्यामुळेही भारतात पाऊस पडतो.
2. उत्तर भारतीय मैदानी प्रदेशात लोहमार्गाचे जाळे विकसित झाले आहे.
3. भारताप्रमाणे ब्राझीलमध्येही प्राणी व वनसंवर्धनाची गरज आहे.
4. ब्राझील देशातील उच्चभूमीच्या ईशान्य भागात पाऊस अतिशय कमी पडतो

**प्र. 5.(अ) दिलेल्या माहितीच्या आधारे रेषालेख काढा.** **(6)**

खालील तक्त्यात भारतातील नागरी लोकसंख्येची टक्केवारी दिली आहे. या तक्त्याच्या आधारे 'रेषा आलेख ' तयार करा. त्याचा अभ्यास करून खालील प्रश्नांची उत्तरे द्या.

| भारत–नागरी लोकसंख्येची टक्केवारी (१९६१–२०११) | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १९६१ | १९७१ | १९८१ | १९९१ | २००१ | २०११ |
| १८.० | १८.२ | २३.३ | २५.७ | २७.८ | ३८.२ |

1. सर्वांत कमी नागरीकरण कोणत्या वर्षात झालेले दिसून येते ?
2. कोणत्या दशकात सर्वाधिक नागरीकरण होते ?
3. या दशकात भारतातील नागरीकरणात किती टक्क्यांनी वाढ झाली ?

**किंवा**

**प्र. 5.(आ) आलेखाच्या आधारे प्रश्नांची उत्तरे लिहा. (6)**







1. कोणत्या देशात साक्षरतेचे प्रमाण अधिक आहे?
2. १९८१ मध्ये दोन्ही देशांत साक्षरतेचे प्रमाण किती होते?
3. भारतात साक्षरतेच्या प्रमाणात सर्वाधिक वाढ कोणत्या दशकांत दिसून येते?

*****